जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक १३.११.२०२४**

## " गावठी कट्टा व जिवंत काडतुस बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक "

दि.११/११/२०२४ रोजी वर्तकनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथील पाहिजे फरारी आरोपीतांचा शोध घेत असताना तपास पथकाचे पोउपनि/व्हि.जे.चिंतामण यांना गुप्त बातमीदार याने माहिती दिली की, दिगंबर ठाकुर पार्कींग मैदानात, पाडा नं ४, लोकमान्य नगर, ठाणे येथे एक इसम कोणतेतरी हत्यार घेवुन वावरत आहे. सदर बातमीची शहानिशा करणे कामी तात्काळ गुन्हे शोध पथकाचे पोउपनि/व्हि.जे.चिंतामण व तपास पथकाचे स्टाफ सदर ठिकाणी पोहचले असता तेथे वर्तक नगर पोलीस स्टेशन येथील रेकॉर्डवरील व सध्या हद्दपार असलेला इसम साहिल मंगेश हुले, वय २४ वर्षे, रा. रू नं ४५७, घोसे चाळ, गणेश सेवा मित्र मंडळ, लोकमान्य नगर पाडा नं ४, ठाणे. हा सशंयितरीत्या वावरत असताना दिसला असता त्यास पळुन जाण्याची संधी न देता शिताफिने सापळा रचुन ताब्यात घेतले व त्याची पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या अंगझडती मध्ये एक गावठी कट्टा व एक जिवंत काडतुस मिळुन आले.

सदर घटनेबाबत वर्तकनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नंबर II १०८६/२०२४ आर्म ॲक्ट ३,२५ सह.महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१),१३५ व १४२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन साहिल मंगेश हुले यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद गुन्हयातील अटक आरोपीत याचे विरूद्ध वर्तकनगर पो.स्टे. येथे खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत

१) I २९/२०२१ भादवि कलम ३३६,४३५, १४१,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७
सह भा.ह.का. कलम ४,२५ सह महा. पो.का. कलम ३७(१),१३५ प्रमाणे
२) I ८०/२०२१ भादवि कलम ३२४,३४२,५०६ प्रमाणे
३) I १६४/२०२१ भादवि कलम ३०७,३२४,५०४,५०६(२),१४३,१४४,१४७,१४८,१४९
४) I ३४७/२०२२ भादवि कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे
५) I ४४४/२०२२ भादवि कलम ३७९ प्रमाणे असे गुन्हे दाखल आहेत.

सदर उल्लेखनिय कामगिरी पोलीस उप आयुक्त परि–५ श्री.अमरसिंह जाधव, सहा पोलीस आयुक्त वर्तकनगर विभाग श्री.मंदार जावळे, तसेच वर्तकनगर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजकुमार वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री.शिवराज म्हेत्रे, पो.नि.(गुन्हे) श्री.मल्हारी कोकरे, तपास पथकाचे पोउपनि/व्हि.जे. चिंतामण, पो.हवा./३२१४ जाधव, पोहवा/४१७४ महाडिक, पोहवा/६६७५ राठोड, पोना/७०५० पाटोळे, पोशि/३००६ सौदागरे, पोशि/८१३४ नागरे यांनी केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर